
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय दहावा

## सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय दहावा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

## अध्याय दहावा

# विभुतियोग

भगवंता तू आत्मबोध करविता । आत्मविद्येचा दाता । परेहून परता । परमेश्वरा ॥१॥
करण्या अज्ञानाचा नाश । समर्थ तूच जगदीश । तुर्येचा तो प्रकाश । भगवंता तू ॥२॥
करतोस जिवाचे कल्याण । प्रकटवूनी आत्मज्ञान । म्हणून तुजला नमन । भगवंता माझे ॥३॥
तू साधकांचा आधार । आत्मतत्त्व तू अपार । वेद उपनिषदांचा सार । तुजठायी भगवंता ॥४॥
करता तुझे भजन । होई भवचक्राचे भंजन । अखिल विश्वाचे उगमस्थान । गुरुराया तू ॥५॥
तुझा अनुग्रह होता । बालकाठायीही प्रकटते विद्वत्ता । विद्या प्रज्ञेचा दाता । भगवंता तू ॥६॥
गुरूने देता अभय वचन । शिष्याचे होते कल्याण । आणि नवरसांचे प्रकटन । तेथे होई ॥७॥
अंतरी प्रकटता अनुभूती । मुकाही होतसे वाचस्पती । असामान्य ग्रंथनिर्मिती । होई तेथे ॥८॥
तुझा आशीर्वाद लाभता । अंतरी आत्मतत्त्व प्रकटता । मग शिवाचीच योग्यता । तया अंगी ॥९॥
ऐसी तुझी कीर्ती महान । कैसे करू तुझे वर्णन । सूर्यासी का कधी उटणं । लावले कोणी ॥१०॥
कैसे कल्पवृक्षा सजवावे । काय पक्वान्न क्षीरसागरा द्यावे । कापुरा सुवासिक करावे । ऐसा सुगंध कोठे ॥११॥
चंदना उटी लावणे । अमृता जेऊ घालणे । आकाशी ते चढणे । घडेल कैसे ॥१२॥
करण्या तुझे प्रकटन । असमर्थ सारी साधनं । रहस्य हे जाणून । नमितो तुजला ॥१३॥
मन बुद्धिच्या कारणे । जर होईल तुझे प्रकटणे । ते तर भांग पिऊन बोलणे । जाणतो मी ॥१४॥
करणे तुझे वर्णन । ते सोन्यावर चांदी चढवणं । म्हणून तुजला शरण । आलो देवा ॥१५॥
मी दास निवृत्तीचा । मजवरी उपकार तयांचा । म्हणून संवाद कृष्णार्जुनाचा । सांगतो मी ॥१६॥
उपमन्यूने दूध मागता । क्षीरसागरच दिधला पुरता । ऐसी तुझी उदारता । जाणतो मी ॥१७॥
ध्रुवाचे ते रुसणे । आणि तया तू उदारपणे । खाऊ ध्रुवपदाचा देणे । लीला तुझी ॥१८॥
ब्रह्मज्ञान श्रेष्ठ सर्व ज्ञानात । तेच प्रकटले मम अंतरात । म्हणून भगवद्गीता ओवीत । सांगतो मी ॥१९॥
शब्दांच्या त्या आवाक्यात । आत्मज्ञान नाही येत । परि शब्द बनून अमृत । प्रकटतील येथे ॥२०॥
देहबुद्धि ती संपता । स्वप्नसुषुप्ती ओलांडता । मनी आकळली गीता । अंतरी माझ्या ॥२१॥
जया पडे अंतरीच जाणणे । न शब्दी तयाचे येणे । पण मी बोललो धीटपणे । असावी क्षमा मजला ॥२२॥
तुझ्या कृपाकारणे । घडले गीतेचे ओवीबद्ध होणे । मी पूर्व खंड तो सांगणे । कृपा तुझी ॥२३॥
पहिल्यात अर्जुनाचा विषाद । दुसऱ्यात केला सांख्ययोग विशद । कर्मयोगातील भेद । दावूनिया ॥२४॥
तिसऱ्यात कर्म सांगितले । चवथ्यात ज्ञानसह वर्णिले । पाचव्यात पुन्हा गौरविले । ज्ञानरहस्य ॥२५॥
सहाव्या त्या अध्यायात । आसनापासून ब्रह्मैक्यापर्यंत । अष्टांग योगाचा वृत्तांत । सांगितला आहे ॥२६॥
कैसी असे ती योगस्थिती । काय ती योगभ्रष्टगती । या सर्वांची चर्चा ती । तो अध्याय सहावा ॥२७॥
सातव्या त्या अध्यायात । प्रकृतीचे स्वरूप सांगत । चार भक्तांची ती रीत । वर्णिली आहे ॥२८॥
नंतर प्रयाण मुहूर्ताचे वर्णन । ब्रह्म कर्म अध्यात्म सांगून ।अधिदैव अधिभूत अधियज्ञ । आठव्यात आहे ॥२९॥
बा वेद असती असंख्यात । पण सार आहे जो वेदात । तो सांगितला लाख श्लोकात । महाभारती ॥३०॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

गुह्य जे अध्यात्माचे । संवाद कृष्ण अर्जुनाचे । सार सातशे श्लोकांचे । नवव्यात आहे ॥३१॥
नववा अध्याय सांगताना । भय उपजले होते मना । मी माझा मोठेपणा । सांगत नाही ॥३२॥
राब गूळ साखर । एकाच रसाचे प्रकार । पण चवीत फरक फार । त्यांच्या जसा ॥३३॥
अध्याय काही ब्रह्मस्थिती वर्णितात । काही ब्रह्मरहस्य सांगतात । काही विरून ते जातात । बोलता ब्रह्म ॥३४॥
काय सांगू महत्त्व नवव्याचे । सार जे संपूर्ण गीतेचे । सत्य चिंतन निर्गुणाचे । प्रकटले येथे ॥३५॥
वसिष्ठाची छाटी तळपविली । विश्वामित्रे प्रतिसृष्टी केली । रामाने समुद्रावरून नेली । वानरसेना ॥३६॥
हनुमंते सूर्यासी धरिले । अगस्तीने सागरा गिळले । तैसे अनिर्वाच्य प्रकटले । मुखातून माझ्या ॥३७॥
रामरावण लढले कैसे । ते रामरावणा जैसे । तैसे अध्यात्म कैसे । ते नवव्यात बा ॥३८॥
नवव्यात जे सांगितले । ते जयाने जाणितले । तयासीच बा उमजले । ते गीतातत्त्व ॥३९॥
ऐसे नऊ अध्याय पहिले । मी स्पष्ट करून सांगितले । आता नऊ जे उरले । ते ऐकाल तुम्ही ॥४०॥
आता दहावा आरंभ होईल । भगवंत विभुति सांगतील । रसाळ ज्ञान ऐकाल । तुम्ही आता ॥४१॥
प्रकटवून आपल्या वैभवास । मराठी जिंकेल शांतरसास । आणि ओव्या त्या खास । प्रकटतील येथे ॥४२॥
मूळ ज्ञान संस्कृतात । तेच प्रकटले मराठीत । फरक तो दोहोत । नाहीच मुळी ॥४३॥
जसे लावण्य जातिवंत । ते दागिन्यांना शोभा आणतं । आणि दोन्ही ते खुलतात । एकमेकाकारणे ॥४४॥
तैसे मराठी आणि संस्कृत । एकच सत्य सांगतात । शब्दी पहा आणतात । ते आत्मतत्त्व ॥४५॥
निराकार घेईल आकार । आता निर्गुण गुणात प्रकटणार । शब्दातीत होऊन शब्दाकार । येईल येथे ॥४६॥
आधीच मराठी सौंदर्यवान । त्यात आत्मतत्त्वाचं प्रकटन । म्हणून ते ओवी बनून । प्रकटले आज ॥४७॥
भगवंत गुरू जो चराचराचा । प्रसाद देण्या आत्मतत्त्वाचा । सखा तो अर्जुनाचा । बोलता झाला ॥४८॥
भगवंत म्हणे अर्जुनास । तू पात्र आत्मज्ञानास । म्हणून तुज ज्ञान ते खास । सांगतो आहे ॥४९॥

भगवान उवाच

मागे गोष्ट जी सांगितली । तुझी परीक्षाच ती घेतली । मी चाचपून बा पाहिली । पात्रता तुझी ॥५०॥
घटी थोडे उदक घालावे । ते न गळे मग पूर्ण भरावे । तैसा तू ऐकतोस मनोभावे । म्हणून सांगतो तुजला ॥५१॥
कोण्या अपरिचिता परीक्षिले । मग तया मुनीम नेमले । तैसे मी तुज दिधले । सर्वस्व माझे ॥५२॥
अर्जुनासी प्रेमाने पाहून । बोलला मग तो भगवान । जैसे पर्वतापाशी येऊन । वर्षतसे मेघ ॥५३॥
भगवंत अर्जुनापाशी आला । आणि मग तयासी बोलला । आधीच मी जो उपदेश केला । तो ऐक पुन्हा ॥५४॥
दरवर्षी शेतात पेरणी करता । पीक ते चांगले वाढता । मग मशागत ती करता । न वाटे कष्ट ॥५५॥
वारंवार तावून काढता । वाढे सोन्याची शुद्धता । वाढणे सोन्याची शुद्धता । तेजदायी ॥५६॥
अर्जुना बा तू नरवीर । मी नसे करत तुजवर उपकार । मी माझ्याच संतोषाखातर । बोलतो आहे ॥५७॥
जैसे बालका घालावे अलंकार । न जाणेच जो शृंगार । परि सुख ते अपार । माते ठायी ॥५८॥
तैसे तुज सांगता ज्ञान । प्रकटते माझे मनी समाधान । पाहून तुझे कल्याण । तृप्ती माझी ॥५९॥
अर्जुना तू प्रिय मज खचित । पडलो मी तुझीया स्नेहात । म्हणून काही केल्या तृप्त । होत नाही ॥६०॥
तेच तेच तुजसी सांगणे । केवळ तुझीया स्नेहाकारणे । कर श्रवण एकाग्र चित्ताने । आता अर्जुना ॥६१॥
परम रहस्य ते अध्यात्माचे । पहा सांगतो तुज साचे । ब्रह्म घेऊन रूप शब्दांचे । प्रकटेल येथे ॥६२॥
परि अर्जुना तू माते । जाणत नाहीस पुरते । येथे जे विश्व भासते । ते मीच गा ॥६३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

येथे वेद मुके झाले । मन पवन ते पांगुळले । आणि रात्रीवीण मावळले । चंद्रसूर्य ॥६४॥
गर्भ जैसा उदरीचा । तया न पत्ता मातेच्या वयाचा । तैसा बोध मम स्वरूपाचा । देवाही नाही ॥६५॥
अशक्य जलचरे सागरा मोजणं । नि चिलटांनी ओलांडणे गगन । तैसे नाही माझे ज्ञान । या महर्षींना ॥६६॥
मी असे तो कोण । कोणापासून माझा जन्म । याचा शोध तो घेऊन । थकले सारे ॥६७॥
हे महर्षी आणि देवगण । तया नसे माझी जाण । जयांचे मीच उगमस्थान । ते कसे जाणतील मजला ॥६८॥
ओहोळ डोंगर चढती ।वा होई शेंडा मुळाची भेट ती ।तैसे विश्वच होऊन जाती । ते जाणती मजला ॥६९॥
जर पान वटवृक्षास झाकील । तरंगात समुद्र सामावेल । वा पृथ्वी ती लपेल । अणुमाजी ॥७०॥
महर्षी देव अथवा जिवाने । लागे मीच होऊनी जाणे । मज जाणण्या पडे होणे । आकाश अर्जुना ॥७१॥
सोडून लौकिकाची चाल ।जो मनइंद्रियांसी सोडेल । तयाचाच जीवभाव सांडेल । जाणता मजला ॥७२॥
जीवभावा मुरड घालून । सूक्ष्म देहांसी त्या ओलांडून । पंचमहाभुते जाता विरून । तो मीच होई ॥७३॥
तेथे तो मीच होऊनी । स्वत: स्वत:स अनुभवूनि । चैतन्यी एकत्व पावूनी । तो ब्रह्म होई ॥७४॥
मीच तो आदि अपार । सकळ लोक महेश्वर । असे अंतरी जाणले तर । कल्याण त्याचे ॥७५॥
जैसा पाषाणात तो परीस । वा रसी अमृत सिद्धरस । तैसा मनुष्यात सरस । ज्ञानी माझा ॥७६॥
ते बिंब जसे ज्ञानाचे । तयाचे अवयव कोंभ अमृताचे । अस्तित्व तयाठायी देहाचे । तो भाग लौकिकाचा ॥७७॥
जसे हिऱ्याची ती जात । तो झाकला जरी कापुरात । वा धरला पाण्याच्या धारेत । नच भंगे तो ॥७८॥
तसा मनुष्य देहात । असला जरी तो वावरत । कामक्रोधाचा तो वात । नाही तेथे ॥७९॥
तया सोडूनी जाई पाप । जैसे जळत्या चंदना सर्प । मनातील विरता संकल्प । भेट माझी ॥८०॥
जाणावे कैसे मजसी । ऐसे जर आले तव चित्तासी । तर माझ्या विविध भावासी । ऐक आता ॥८१॥
जगी जो जो अनुभव येतो । तो सर्व मीच असतो । सर्व अस्तित्वाचा आविष्कार तो । मजठायी ॥८२॥
ते प्रथम जाण बुद्धि । मग ज्ञान जे निरवधि । असंमोह सहनसिद्धि । क्षमा सत्य ॥८३॥
मग शम दम दोन्ही । सुखदु:ख ते वर्ते जनी । परि रागद्वेषाचा अभाव मनी । तयाचे अर्जुना ॥८४॥
पै भय आणि निर्भयता । अहिंसा आणि समता । तृप्ती तप पांडुसुता । दान जे गा ॥८५॥
अगा यश अपकीर्ती । हे जे भाव सर्वत्र दिसती । ते मजपासूनच होती । मनाच्या ठायी ॥८६॥
जीव पशुपक्षी प्राणी । तैसेच वेगळाले मानी । उपजती माझीया ठिकाणी । परि न जाणती मजला ॥८७॥
प्रकाश आणि कवडसे । हे सूर्यास्तवचि जैसे । उगवता प्रकाश दिसे । मावळता अंधार ॥८८॥
ज्या मनी भावाचे प्रकटन होते । ते मन मला न जाणते । म्हणून मनी भावाचे असणे ते । दुर्दैव अर्जुना ॥८९॥
ऐसी माझीया भावी । हे जीवसृष्टी आघवी । गुंतली असे जाणावी । पांडुकुमारा ॥९०॥
आता या सृष्टीचे पालक । जया अधीन वर्तती लोक । ते अकरा भाव आणिक । सांगेन तुजला ॥९१॥
जे आघव्या गुणांची खाणी । जे महर्षी प्रबुद्ध ज्ञानी । ते कश्यपादि मुनी । ॠषी सात ॥९२॥
एका त्या ब्रह्मदिवसात । चौदा मनु होतात । असती मुख्य त्या चौदात । मनु चार ॥९३॥
ऐसे हे अकरा । माझ्या मनी जाहले धनुर्धरा । सृष्टीचिया व्यापारा । लागोनिया ॥९४॥
जेव्हा काहीच नव्हते । त्रिभुवनही अस्तित्वात आले नव्हते । आणि ही पंच महाभुते । नव्हती जेव्हा ॥९५॥
तेव्हा हे अकरा जाहले । मग त्यांनीच अस्तित्व प्रकटवले । अष्टपाल पहा रचले । यांनीच अर्जुना ॥९६॥
म्हणोनी अकरा हे राजा । मग येर जग यांचीच प्रजा । ऐसा विश्वविस्तार माझा । झाला मग ॥९७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आरंभी बीज एकले । मग मूळ खोड जाहले । खोडातून फाटे निघाले । फांद्यांचे नंतर ॥९८॥
फांद्यांपासून अनेका । फुटलिया नाना शाखा । मग शाखास्तव देखा । पालवी पाने ॥९९॥
पालवी फूल फळ । एवं वृक्षत्व जाहले सकळ । जे निर्धारिता केवळ । बीजचि आघवे ॥१००॥
वैश्विक मीपण तत्त्व पहिले । त्यातून मन प्रकटले । मनाने मग निर्मिले । हे अकरा ॥१०१॥
यांनी लोकपाल नेमले । तयांनी चवदा लोक मांडले । त्या लोकांत निपजले । प्रजाजात ॥१०२॥
भावाचे रूप घेऊन । प्रकटलो विश्व होऊन । प्राण्या नाही ज्ञान । तादात्म्य पावल्यानं ॥१०३॥
यालागी सुभद्रापती । हे भाव माझीया विभूती । आणि यांचिया व्याप्ती । मी व्यापिले जग ॥१०४॥
म्हणोनि गा यापरी । ब्रह्मादि पिपिलिकावरी । मी वाचूनि दुसरी । गोठी नाही ॥१०५॥
ऐसे जाणे जो साचे । तया अंतरीच अधिष्ठान ज्ञानाचे । म्हणोनी अधमाधम भेदाचे । दु:स्वप्न नाही ॥१०६॥
मी सर्व विभुतींचे अधिष्ठान । विभुतीमुळे विश्वाचे प्रकटन । हे सर्व अंतरात जाणणं । तोचि योग ॥१०७॥
ऐसा महायोग घडता । वैश्विक चैतन्यी एकरूप होता । सर्व संशय तो विरता । मुक्ती घडे ॥१०८॥
ऐसे विश्वासी एकत्व पावून । जया अंतरी अभेदाची जाण । तयाचेच बा भजन । पूर्ण झाले ॥१०९॥
ऐसे एकत्व जे अनुभवती । तयाच्या सर्व शंका संपती । या योगाची ती महती । सांगितली षष्ठी ॥११०॥
कैसे जाणावे हे एकत्व । उठली जिज्ञासा तुझ्या मनात । म्हणून असे मी सांगत । ऐक आता ॥१११॥
तरी मीचि एक सर्वा । मजपासूनच सर्वांचा जन्म पांडवा । आणि निर्वाह यांचा आघवा । माझे ठायी ॥११२॥
लाटा असती अगणित । परि त्या पाण्यातच जन्मतात । तयांचे उठणे विरणे पाण्यात । अखंड जैसे ॥११३॥
सर्व त्या लाटात । पाण्यावाचून का अन्य काही असतं । तैसे विश्व होऊन असे वसत । मीच अर्जुना ॥११४॥
ऐसे व्यापका मज जाणून । जयाचे चालते भजन । तयांच्या अंतरी संचारण । प्रेमभावाचे ॥११५॥
जाणून देश काळ वर्तमान । तो विश्वी विचरे विश्व होऊन । जैसे वायू होऊनी गगन । गगनी विचरे ॥११६॥
ऐसे जे निजज्ञानी । राहती सुखात या त्रिभुवनी । विश्वासी एकत्व अनुभवूनी । मुक्त होती ॥११७॥
जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥११८॥
चित्ते मीचि जाहले । मजसी एकरूप पावले । तयांचे जन्ममरण खुंटले । बोधाकारणे ॥११९॥
मग त्या बोधाचे कारणे । विश्वी निश्चिंत होऊन राहणे । आणि त्या बोधाचेच घेणे देणे । आवडे तया ॥१२०॥
जैसी जवळची सरोवरे । उचंबळता मिसळती परस्परे । लाटांच्या एकत्वाद्वारे । एकचि होती ॥१२१॥
तैसे एकमेका भेटता । दोही अंतरी बोधाचा राबता । बोधासी बोध भेटता । आनंदीआनंद ॥१२२॥
सूर्याने सूर्या ओवाळावे । कि चंद्राने चंद्रास भेटावे । अथवा दोन जलप्रवाह मिसळावे । एकमेकांत ॥१२३॥
अष्ट सात्त्विकभाव प्रकटून । प्रयागतीर्थ बोधाचे होऊन । सर्व मार्गांचे सार जाणून । ब्रह्म व्हावे ॥१२४॥
ऐसे महासुख पावून । देहभाव तो विसरून । पहा ते मीच होऊन । नाचू लागती ॥१२५॥
शिष्याच्या त्या कानात । गुरू जे एक अक्षर सांगतात । ते असे आता गर्जत । त्रिजगती ॥१२६॥
जेधवा कळी कमळ होते । मग पसरणे सुगंधाचे आपोआप ते ।आणि सर्वांना मेजवानी मिळते ।सुगंधाची ॥१२७॥
ऐसा घोष ब्रह्ममयतेचा करत । स्वत:शीच ते विसरत । माझ्यात ते विरतात । त्यागता जीव ॥१२८॥
ऐसी प्रकटता प्रेमस्थिती । ते माझ्यात सामावून जाती । ऐसे काळवेळ न जाणती । भक्त माझे ॥१२९॥
मग पहा अर्जुना । जे आम्ही द्यावे तयाना । अंतरी त्या ब्रह्ममयतेचा ठिकाणा । आधीच त्यांच्या ॥१३०॥
ज्यामार्गे तयांचे चालणे । ते स्वर्गाहूनही श्रेष्ठ असणे । म्हणून घडे स्वर्गाचेही त्यागणे । त्यांचे ठायी ॥१३१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तयांच्या प्रेमाकारणे। आम्ही तयाचे ऋृणी असणे। जे आम्ही तया देणे। ते आधीच अंतरी त्यांच्या ॥१३२॥
यानंतर ऐसे घडते। तयांचे ब्रह्मसुख वाढते। आणि काळाचीही दृष्टी न पडते। त्यांच्यावरी ॥१३३॥
माता बालका प्रेम करते। आणि तयाचे लाड पुरविते। ती बाळापाठोपाठ धावते। प्रेमाकारणे ॥१३४॥
जो जो खेळ तयाने दावणे। आणि मातेचा आनंद वाढणे। तैसे या जयघोषाकारणे। तृप्ती माझी ॥१३५॥
ऐसा जे जयघोष करतात। ते मलाच बा पावतात। तयांच्या त्या रक्षणात। रुचि मजला ॥१३६॥
भक्तासी माझी आवड। मलाही तयांची चाड। करणे तयांचे लाड। कर्तव्य माझे ॥१३७॥
द्वार ते निर्मिलं स्वर्ग मोक्षाचं। जे भक्तांच्याच हिताचं। आणि जाहलो आम्ही तयाचेच। लक्ष्मीसह ॥१३८॥
द्वैत विरहित जे अद्वैत। अंतरी अनुभवती माझे भक्त। लपवून ठेवले ते अंतरात। भक्तांसाठी ॥१३९॥
ब्रह्ममयतेची ही बात। ती शब्दांत नाही येत। अनुभूती येता अंतरात। भेट माझी ॥१४०॥
मज आत्मतत्त्वाच्या ठिकाणी। करून जीवभावाची आटणी। मनइंद्रिया त्यागुनी। तो मीच होई ॥१४१॥
त्या ज्ञानियासाठी। दिवसा मशाल घेऊन हाती। मीच दावे वाट ती। पुढती पुढती ॥१४२॥
अज्ञानाची रात मालवून। जीवभावाचा अंधार घालवून। आत्मज्ञान प्रकाश उजळून। मोक्ष देई ॥१४३॥
ऐसे प्रेमळ जो प्रियतम। बोलला जेधवा पुरुषोत्तम। तेथे अर्जुन म्हणे मनोधर्म। निवाले माझे ॥१४४॥

अर्जुन उवाच

पहा भगवंता काय झाले। माझे जन्ममरण खुंटले। जीवभावाच्या रोगा नाशिले। भगवंता तू ॥१४५॥
जन्मपण स्वत:चे आपले। आज माझ्या अंतरी देखिले। आज पहा ओळखले। मी मजला ॥१४६॥
आज माझे आयुष्य उजळले। दैव पहा कसे फळफळले। ते ज्ञान मी ऐकिले। जे मुक्तिदायी ॥१४७॥
तुझ्या उपदेशाकारण। संपले जीवभावाचे अज्ञान। आता संपूर्ण ब्रह्मज्ञान। प्रकटले अंतरी ॥१४८॥
आहेस गा तू परब्रह्म। जे या महाभुतांचे विश्राम धाम। पवित्र तू परम। जगन्नाथा ॥१४९॥
तू परमदैवते तिही देवा। तू पुरुष जो पंचविसावा। दिव्य तू अमृताचा ठेवा। पैलतीराचा ॥१५०॥
अनादिसिद्ध तू स्वामी। जो नाही बा जन्मधर्मी। तो तू हे आम्ही। जाणले आता ॥१५१॥
तू काळाचा सूत्रधार। तू जीवनाचा आधार। तू ब्रह्म अपार। कळले मजला ॥१५२॥
आणिकही एकप्रकारे। तुझी खात्री होत असे रे। मागील ऋृषी सारे। तेच सांगती ॥१५३॥
तयांनी सांगितल्याचे सत्यपण। देखतसे माझे अंत:करण। कृपा केली आपण। म्हणून देवा ॥१५४॥
एऱ्हवी नारद नेहमीच येऊन। गात असती तुझे वचन। परि अर्थ न जाणून। रमलो गीत सुखी ॥१५५॥
आंधळ्याच्या त्या गावी। जरी प्रगटला रवी। तो केवळ उष्णताच अनुभवी। नेणोनी प्रकाशा ॥१५६॥
नारदांनी ही अध्यात्म सांगाता। आम्हा आवडे गाण्यांची मधुरता। गाणेच समजे चित्ता। ब्रह्म नाही ॥१५७॥
असित देवलांच्या मुखातून। ऐकले होते तुझे ज्ञान। परि मनइंद्रियी रममाण। होते तेव्हा ॥१५८॥
इतका जोर होता इंद्रियांचा। कडू लागला विषय परमार्थाचा। आणि कडू विषय इंद्रियांचा। गोड लागे ॥१५९॥
अजून काय सांगावे। नेहमी घरा येऊन व्यासदेवे। तुझे स्वरूप आघवे। सांगितले सर्वदा ॥१६०॥
अंधारात चिंतामणी देखिला। नाही बुद्धीस तो समजला। सूर्योदय होता ओळखला। होय म्हणोनी ॥१६१॥
तैसी व्यासादिकांची बोलणी। त्या तर चिद्रत्नांच्या खाणी। परि नच समजला मनी। उपदेश तो ॥१६२॥
आता तुझ्या उपदेशाकारणे। घडले त्या ज्ञानाचे आकळणे। जसे अंधार तो संपणे। उगवता सूर्य ॥१६३॥
ज्ञानाचे बीज तयांचे बोल। हृदयभूमीत पडले सखोल। लाभता तुझ्या कृपेची ओल। अंकुरले आता॥१६४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अहो नारदादिक संत । ते ज्ञानच असती सांगत । मी गगनच जाहलो अनंत । उमजता त्यांना ॥१६५॥
प्रभू घेऊनि अनंत जन्म । केले मी दानधर्म । म्हणून तुझे ते वर्म । समजले मला ॥१६६॥
एऱ्हवी वाडवडिलांकडून । मी ऐकले होते तुझे गुणगान । परि ज्ञान तुझ्या कृपेवीण । आकळले नाही ॥१६७॥
भाग्य असता अनुकूल । प्रयत्न होती सफल । तैसे ज्ञान ते प्रकटलं । कृपा तुझी ॥१६८॥
माळ्याने झाड ते वाढवणे । नि रात्रंदिन श्रमणे । परि घडे फळांचे ते लागणे । वसंतात ॥१६९॥
विषमज्वर तो सरता । आवडते ती मधुरता । जैसे आरोग्य देही असता । रसायन गोड ॥१७०॥
इंद्रिय वाचा आणि प्राण । यांचं तेव्हाच सार्थक होणं । जेव्हा चैतन्य ते येऊन । संचरे तेथे ॥१७१॥
तैसे साही शास्त्र धुंडाळीले । अथवा योगादिक जे अभ्यासले । परि ते सार्थकी लागले । सद्‌गुरू भेटता ॥१७२॥
ऐशा प्रतितीच्या कारण । अर्जुन म्हणाला आनंदून । देवा तुझं म्हणणं । उमजलं मला ॥१७३॥
सत्यच बा कैवल्यपती । घडली मज ब्रह्मप्रतिती । जे जाणण्या देवदानवांची मती । नाही समर्थ ॥१७४॥
आपुल्या जाणिवेसी जाणता । परि तुझी कृपा न होता । नच प्रकटते ती ब्रह्ममयता । समजले मला ॥१७५॥
गगनाचे जे अनंतपण । जसं गगनानेच जाणणं । वा पृथ्वीचे ते घट्टपण । जाणे पृथ्वी ॥१७६॥
तैसी तुझी ती व्याप्ती । तूच जाणसी लक्ष्मीपती । येर वेदादिक मति । गेल्या वाया ॥१७७॥
मनासी कैसे ओलांडावे । वाऱ्यासी कैसे मुठीत घ्यावे । अंतरी आदिशून्य ते अनुभवावे । कैसे भगवंता ॥१७८॥
तैसे तुझे जाणणे आहे । म्हणून ते कोणास ठाऊक नोहे । तुझे ते ज्ञान होये । केवळ तुजला ॥१७९॥
तुझे ज्ञान केवळ तुजला । आणि समर्थ तूचि सांगायाला । म्हणून आमच्या जिज्ञासेला । पूर्ण करावे ॥१८०॥
हे ऐकले का भगवंता । तूच या त्रिभुवनाचा दाता । शरण सकल देवदेवता । तुझ्याचरणी ॥१८१॥
थोरपण तुझे पहाता । नाही तूज सलगीची योग्यता । परि तुज विनंती न करता । ज्ञान नाही ॥१८२॥
अनंत पाणी नद्या समुद्रात । परि चातका कामा नाही येत ।चातक असे केवळ सेवत । थेंब मेघातील ॥१८३॥
तैसे श्री गुरू सर्वत्र असती । परि भगवंता तूच आम्हा गती । म्हणून सांग त्या विभुति । मजला देवा ॥१८४॥
अद्‌भुत तुझ्या विभुति । नि अनेक तयांच्या शक्ती । सांगावी तयाची महती । भगवंता मजला ॥१८५॥
तुझ्या विभुति त्या समस्त । ज्या असती तिन्ही लोकांत । त्यातील मुख्य नामांकित ।सांगाव्यात पुन्हा ॥१८६॥
मी तुजला कैसे जाणावे । काय समजून चिंतावे । सारे विश्वच तू आघवे । चिंतू कोणा ॥१८७॥
म्हणून विविध भाव जैसे । मागे तू सांगितले असे । आता विस्तारून तैसे । सांगावे पुन्हा ॥१८८॥
ज्या भावासी चिंतणे । घडेल मजठायी सहजपणे । ते तू स्पष्टपणे । सांगावे देवा ॥१८९॥
ज्या विचारल्या मी विभुती । त्या सांगाव्या मजप्रती । जरी झाली ती पुनरावृत्ती । हरकत नाही ॥१९०॥
त्या दैवी अमृताच्या सेवना । मी कसा म्हणेल ना । त्या भौतिक अमृतपाना । देवही अधीर ॥१९१॥
ते भौतिक अमृत पिऊन । लाभते अंशत: अमरपण । तेथे चौदा इंद्रांचं होणं । एक ब्रह्मदिवशी ॥१९२॥
अमृत केवळ सागराचा रस । तेथे उगाच अमृताचा भास । परि तयाच्या सेवनास । अधीर सगळे ॥१९३॥
जे भौतिक अमृतपान । तया बा एवढा मान । मग तुझे तर वचन । परमामृत देवा ॥१९४॥
मंदार पर्वताने न मंथता । क्षीरसागरा न घुसळता । जे अनादिच स्वभावता । आयते आहे ॥१९५॥
नाही आकार वा प्रकार । जे इंद्रियांसी अगोचर । जे अंतरीच आहे अपार । पाहू जाता ॥१९६॥
एकत्व तयाशी जाणता । होते विश्वाचीच सांगता । अनुभवणे ऐसी नित्यता । तोचि मोक्ष ॥१९७॥
जन्ममृत्यूची कथा । संपून जाते सर्वथा । आत बाहेर आनंदाचा राबता । घडे तेथे ॥१९८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

देता तुजसी ते चित्त । तुझी भेट होते निश्चित । तुझ्या भेटीची ही रीत । ठाऊक मजला ॥१९९॥
मनइंद्रियासी तादात्म्य तुटता । प्रकटते अंतरी ब्रह्ममयता । मग आनंदाचीच कथा । आत बाहेर ॥२००॥
कैसे करावे या सुखाचे वर्णन । माझीया चित्ता नाही जाण । ते पुनरूक्ती करून । सांग देवा ॥२०१॥
सूर्य का शिळा होतो । अग्नी का अलिंगता येतो । गंगाजळा का कधी लाभतो । पारोसेपणा ॥२०२॥
स्वमुखातून जे तू सांगितले । ते तर शब्दब्रह्मच अवतरले । आत्मतत्त्वा अनुभवले । अंतरी आम्ही ॥२०३॥
तया पार्थाचिया बोला । सर्वांगी श्रीकृष्ण डोलला । म्हणे हा भक्तिज्ञानास झाला । पात्र आज ॥२०४॥
अर्जुनाचे भाषण ऐकून । देव गेला प्रेमाने उचंबळून । पण तो स्वत:सी सावरून । बोलता झाला ॥२०५॥

श्री भगवानुवाच

मी ब्रह्माचेही अधिष्ठान । परि गेलो स्वत:स विसरून । आवडलं बा तुझं बोलणं । मजसी अर्जुना ॥२०६॥
तयाने अर्जुना बा म्हणणे । आम्हा तयाचे आश्चर्य नसणे । भगवंत झाला नाही का आनंदाने ।पुत्र नंदाचा ॥२०७॥
ऐसे शब्द ते वापरणे । ते प्रेमाच्याच कारणे । मग भगवंत तो म्हणे । ऐक आता ॥२०८॥
तू विचारल्यास बा विभुति । ज्या अनंत अनंत असती । पण माझीही ती मती । न आकळे त्या सर्वा ॥२०९॥
अंगावर जे केस असतात । ते कधी का मोजता येतात । तशा माझ्या विभूति असतात । अगणित ॥२१०॥
किती मोठा मी आकारानं । नाही मलाही त्याचे ज्ञान । म्हणून विभूति ज्या प्रधान । ऐक त्यांना ॥२११॥
मुख्य विभूति जाणता । सर्व विश्वच येईल हाता । जैसे बीज मुठीत धरता । येई तरू ॥२१२॥
जर हाता आले उद्यान । मग फळे फुले प्राप्त होणं । तैसे या विभूति जाणून । जाणावे मजसी ॥२१३॥
हे सत्यच असे धनुर्धरा । नाही शेवट माझीया विस्तारा । गगना ऐसिया अपारा । सामावतो मी ॥२१४॥
ऐक बा धनुर्धर । तू धनुर्विद्येत दुसरा शंकर । ज्या आत्मतत्त्वाचा सर्वांभुती विहार । ते मीच अर्जुना ॥२१५॥
मीच राहतो अंत:करणी । आणि मीच प्रकटतो देह होऊनी । मी आदि आणि निर्वाणी । मध्ये ही मीच ॥२१६॥
जसे मेघाच्या आत बाहेर । आकाशच असे सर्वदूर । तसा विश्वाचा आधार । मीच अर्जुना ॥२१७॥
मेघ जेधवा लया जाती । ते आकाशच होऊन ठाकती । तैसे भुते सामावती । मजठायी अर्जुना ॥२१८॥
जाणण्या ते व्यापकपण । तू माझ्या विभुतींना जाण । जिवाचा तू करून कान । ऐक आता ॥२१९॥
सगळेच सांगितले अर्जुना । परि म्हटलो सांगेन विभुतींना । म्हणून निभावण्या वचना । बोलतो आता ॥२२०॥
मग बोलला तो कृपावंत । विष्णू मी बारा आदित्यात । आणि रवी प्रकाशवंतात । म्हणती मजला ॥२२१॥
पन्नास त्या मरुद्गणात । मला मरीचि म्हणतात । आणि आकाशी तारांगणात । चंद्र मी ॥२२२॥
वेदात मी सामवेद । आणि देवात देव इंद्र । प्रसिद्ध माझे नाव गोविंद । सर्वत्र अर्जुना ॥२२३॥
इंद्रियात जे प्रधान । ते मीच असे बा मन । आणि भुतांचा जो प्राण । ती चेतना मी ॥२२४॥
श्रेष्ठ मी चौदा रुद्रांत । मलाच शिव म्हणतात । जो करी मदनाचाही घात । तो शंकर मी ॥२२५॥
यक्ष राक्षस गणात । शंभूचा सखा जो धनवंत । तो कुबेर अति श्रीमंत । मीच अर्जुना ॥२२६॥
अग्नि मी आठ वसूत । आणि उंच अशा पर्वतात । मलाच मेरू बा म्हणतात । अर्जुना माझ्या ॥२२७॥
जो स्वर्गाचा अधिपती । सर्वज्ञ जयाची मती । मीच तो बृहस्पती । जाण अर्जुना ॥२२८॥
त्रिभुवनी सेनापतीत । मला कार्तिक म्हणतात । शिवापासोनी जन्मला कृत्तिकांत । तो मीच ॥२२९॥
सकल त्या सरोवरात । मला समुद्र म्हणतात । आणि महर्षी तपस्व्यात । भृगु तो मीच ॥२३०॥
जो शब्दांच्याही पार । नि सर्व विश्वाचा आधार । मीच तो ओंकार । वैकुंठीचा ॥२३१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

समस्त त्या यज्ञात । मला जपयज्ञ म्हणतात । मज ओंकारा उपासितात । योगीजन ॥२३२॥
नाम जप यज्ञ परम । तया न बाधू शके स्नानादि कर्म । नामे पावन धर्माधर्म । ते नाम मी ॥२३३॥
स्थावर आणि पर्वतात । मला हिमालय म्हणतात । मीच असे बा कांत । त्या लक्ष्मियेचा ॥२३४॥
सुंदर असे पारिजात । चंदना अंगी गुण अगणित । पण सर्व वृक्षजातीत । अश्वत्थ मी ॥२३५॥
अर्जुना त्या देवऋषीत । मला नारद म्हणतात । आणि चित्ररथ गंधर्वात । नाम माझे ॥२३६॥
सर्व सिद्धजनात । मला कपिल म्हणतात । आणि त्या अश्वांच्या जातीत । उच्चैःश्रवा मी ॥२३७॥
राजांना हत्तींचे भूषण । हत्तीत मी ऐरावत जाण । देवांनी प्राशिले करून सागरमंथन । ते अमृत मी ॥२३८॥
मी मनुष्यांमध्ये राजा । तोच विभूति विशेष माझा । जयाची सकळ प्रजा । सेवा करी ॥२३९॥
अवघ्या त्या हत्यारात । मला वज्र म्हणतात । जे शोभे इंद्राच्या हातात । सदैव अर्जुना ॥२४०॥
कामधेनू मी गायीत । आणि मदन प्रजनात । या दोन्ही विभूति प्रख्यात । माझ्या जगती ॥२४१॥
सर्पकुळाचा अधिष्ठाता । तो वासुकी मी कुंतीसुता । नागांमध्ये अनंता । नाव माझे ॥२४२॥
सर्व जलचरी तैसे । मीच वरुण गा असे । जो पश्चिमेचा पती असे । जाण तू अर्जुना ॥२४३॥
अर्जुना बा पितृगणात । मला अर्यमा म्हणतात । समस्त जन ते पूजतात । तयासी अर्जुना ॥२४४॥
जगाची कर्मे लिहितात । जिवांवर लक्ष ठेवतात । आणि केल्याप्रमाणे भोग देतात । जे कर्म नियंते ॥२४५॥
त्या बा कर्मनियंत्यात । मला यम म्हणतात । जो कर्म साक्षीरूपाने असे वसत । सर्वांमाजी ॥२४६॥
अगा दैत्याच्या कुळात । मला प्रल्हाद म्हणतात । जो दैत्यस्वभावात । न अडकला कधी ॥२४७॥
त्या हिंस्त्र प्राण्यात । मला सिंह म्हणतात । श्रेष्ठ जो वनपशुत । असे अर्जुना ॥२४८॥
पक्ष्यांच्या त्या जातीत । मला गरुड म्हणतात । जो गगनी असे उडत । घेऊनी मजला ॥२४९॥
पृथ्वीच्या अफाट पसाऱ्यात । जो कोठेही पोहचे क्षणार्धात । सप्तसागर एका उड्डाणात । पार करी ॥२५०॥
त्या सर्व वेगवंतात । मला पवन म्हणतात । आणि सर्व शस्त्रधाऱ्यात । राम मी ॥२५१॥
धर्माचे करण्या रक्षण । हाती घेऊन धनुष्यबाण । नीतीधर्माचे लावले निशाण । जगती त्याने ॥२५२॥
रामरावण संग्रामात । रावणाचा नाश करत । तयाने अधर्मा केले पराभूत । युद्धी अर्जुना ॥२५३॥
जयाने देवांचा मान वाढवला । धर्माचा जीर्णोद्धार केला । सूर्यवंशी बा जन्मला । सूर्य जसा ॥२५४॥
त्या श्रेष्ठ शस्त्रधाऱ्यात । मलाच राम म्हणतात । आणि मगर मी पुच्छवंत । जलचरामाजी ॥२५५॥
भगीरथे गंगा प्रकटविली । परि जन्हूने ती गिळली । मग मांडी चिरून आपली । प्रकटविली जगती ॥२५६॥
जी त्रिभुवनी वाहते सरिता । ती जान्हवी मी पांडुसुता । श्रेष्ठ जलप्रवाह समस्ता । आहे जी ॥२५७॥
नाव एकेक घेऊन । जर मी केले विभुतीचे वर्णन । शेकडो जन्मही न पुरतीन । वर्णण्या ते ॥२५८॥
जर नक्षत्रे गगनीची । इच्छा झाली जर वेचायची । मग मोट ती गगनाची । बांधावी लागे ॥२५९॥
गणती जर अणुरेणूची करावी ।मग पृथ्वीच काखेत घालावी । तैसे माझी ओळखी घ्यावी । होऊनी मीचि ॥२६०॥
जर शाखा फळ फुलाते । एक वेळी कवटाळावे वाटते । मग झाडच उपटून ते । घ्यावे हाती ॥२६१॥
सर्व माझ्या विभुतींना । जर जाणायचे असेल अर्जुना । तर अंतरी एकरूप होऊन गगना । जाण मजसी ॥२६२॥
एऱ्हवी वेगळे ते राहून । तू मजला कसा जाणशीन । म्हणून तू ब्रह्ममय होऊन । जाण मजसी ॥२६३॥
अवघ्या या सृष्टीत । मीच आदि मध्य अंत । वस्त्री जसा असे ओतप्रोत । तंतू अर्जुना ॥२६४॥
या विभुतींना जाणून । तुला मी नच कळेन । परि तुझी पात्रता नसल्यानं । सांगतो विभूति ॥२६५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तू विचारल्यास विभूति । म्हणून ऐक सुभद्रापति । मीच विद्यात श्रेष्ठ ती । अध्यात्म विद्या ॥२६६॥
सर्व त्या बोलणाऱ्यात । मलाच वाद म्हणतात । जो कधीच नाही संपत । चर्चेमाजी ॥२६७॥
तो केला नाही तर वाढतो । केल्यास जोर चढतो । तो वक्त्यास गोड वाटतो । सदासर्वदा ॥२६८॥
ऐसा प्रतिपादनात वाद । तो मीच पहा गोविंद । अक्षरात जो आद्य । तो अकार मी ॥२६९॥
अर्जुना त्या समासात । मलाच द्वंद्व म्हणतात । त्या चिलटात आणि ब्रह्मात । मीच वसे ॥२७०॥
मेरुमंदार पर्वतासहित । जो असे पृथ्वीसही जिरवीत । प्रलयाची ही वाताहत । होई तेथे ॥२७१॥
प्रलयास मुठीत धरून । पवनासही टाकी गिळून । आकाशही जाये सामावून । तयाच्या पोटी ॥२७२॥
ऐसा काळाचाही काळ । तो मीच म्हणे गोपाळ । आणि मीच रचतो सृष्टीचा मेळ । पुढती अर्जुना ॥२७३॥
मीच करतो भुतांचे सृजन । सकळ प्राण्यांचे मी जीवन । आणि मीच देत असे मरण । सर्वांना अर्जुना ॥२७४॥
आता समस्त स्त्री जातीत । माझ्या विभूति असती सात । तयांना असे मी वर्णीत । ऐक अर्जुना ॥२७५॥
अर्जुना नित्य नवी जी कीर्ती । ती माझीच गा मूर्ती । आणि औदार्य विये जी संपत्ती । तीही मीच ॥२७६॥
न्यायाच्या आसनी बसून । विवेक रथावर आरूढ होऊन । ते जे वाचेचे प्रकटन । ते मीच अर्जुना ॥२७७॥
पदार्थासी त्या पाहून । मनी येते जी आठवण । ते ज्या स्मृतिकारण । ती स्मृति मी ॥२७८॥
त्या मेधा क्षमा धृति । माझेच रूप बा असती । प्रकटून त्या या जगती । नांदती सदा ॥२७९॥
ऐशा या नारीत । वसे मीच बनून शक्ती सात । आणि असे मग चालत । हे संसारचक्र ॥२८०॥
असंख्य गोष्टी त्या वेदात । अर्जुना बृहत्साम मी त्यात । मलाच रमाकांत म्हणतात । नाथ रमेचा ॥२८१॥
सकल त्या छंदात । गायत्री मलाच म्हणतात । मनी होता बा निभ्रांत । कळते स्वरूप माझे ॥२८२॥
सर्व त्या मासात । मलाच मार्गशीर्ष म्हणतात । आणि ऋतूत जो वसंत । तो मीच अर्जुना ॥२८३॥
फसवणूक त्या करणाऱ्यात । मला जुगार बा म्हणतात । लुबाडे जो चौरस्त्यात । पैज देऊनी ॥२८४॥
तेज जे सर्वांते । ते माझेच रूप असते । आणि विजय जो कार्याते । तोही मीच ॥२८५॥
जयाने नीतीने उद्योग केला । तो नीतीवान मीच झाला । ऐसा मजसीच येऊन मिळाला । नीतिवान तो ॥२८६॥
श्रेष्ठ गुण जो सज्जनात । ते सत्त्व मलाच म्हणतात । आणि महान जो यादवात । तो कृष्ण मी ॥२८७॥
देवकीपोटी जन्मला । आणि गोकुळात वाढला । मारिले तयाने पूतनेला । स्तनी लागून ॥२८८॥
जयाने बालपणात । सृष्टी केली दानवरहित । आणि इंद्रा दिली मात । उचलुनी गोवर्धन ॥२८९॥
तयाने कालियास मारिले । नि जळते गोकुळ रक्षिले । आणि पिसे ब्रह्मदेवा लाविले । चोरता गोधन ॥२९०॥
तयाने बालवयात । लावली कंसाची वासलात । आणि आसुरांना ठार करत । दाविली लीला ॥२९१॥
हे काय किती सांगावे । तुज माहीत आहे ते आघवे । कृष्णास यादवामाजी जाणावे । स्वरूप माझे ॥२९२॥
आणि तुम्हा पांडवात । मला अर्जुन म्हणतात । म्हणून आपल्या प्रेमभावात । बिघाड नाही ॥२९३॥
संन्यासी तुवा होऊनी । चोरुनि नेली होती भगिनी । तरी विकल्प न उपजला मनी । तू मी एक ॥२९४॥
त्या श्रेष्ठ मुनीत । मलाच व्यास म्हणतात । आणि त्या ऋषी जनात । शुक्राचार्य मी ॥२९५॥
सर्व त्या शासनकर्त्यात । मलाच दंड म्हणतात । मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत । शासन माझे ॥२९६॥
जयाठायी सारासार चिंतन । नि न्यायाचीच बाजू घेणं । ते सर्व शास्त्रात महान । नीतीशास्त्र मी ॥२९७॥
अवघ्या त्या गूढ शक्तीत । मला मौन म्हणतात । आणि जो जाई पूर्ण मौनात । तया भेट माझी ॥२९८॥
अगा ज्ञानियांच्या ठिकाणी । मीच राही ज्ञान बनूनी । मी आणि तो ज्ञानी । भिन्न नाही ॥२९९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

त्या पर्जन्याच्या धारा । मोजता येतील धनुर्धरा । वा पृथ्वीचिया तृणांकुरा । हिशेब होई ॥३००॥
समुद्रांच्या लाटांची गणती । नच करता येते ती । तैशा माझ्या विभूति । मोजणे अशक्य ॥३०१॥
केवळ उदाहरणाखातर । मी विभूति सांगितल्या पंचाहत्तर । पण ज्ञान हे वर वर । आहे अर्जुना ॥३०२॥
माझ्या स्वरूपाचा विस्तार । जो आहे अति अपार । मनइंद्रियांच्या जाता पार । ज्ञान माझे ॥३०३॥
म्हणून एकदा तुजला । दावितो मी मम स्वरूपाला । जेथून सर्व भुतांचा गलबला । निर्माण होई ॥३०४॥
म्हणून कुणा लहानथोर न म्हणावे । उच्च-नीच भाव सांडावे । एक मीचि ऐसे मानावे । सर्व जगता ॥३०५॥
आता एक सर्वसाधारण । सांगतो मी तुला खूण । त्या खुणेशी तू जाणून । जाणावी विभूति ॥३०६॥
जेथे जेथे शक्ती आणि दया । दोन्ही वस्तीस आली ठाया । ते ते जाण धनंजया । विभूति माझी ॥३०७॥
सूर्यबिंब एकटेच असे आकाशी । परि त्रिभुवना ते प्रकाशी । तैसे तत्त्व ते साक्षी । विश्वात्मक ॥३०८॥
चूक तया एकटे वा निर्धन म्हणणे ।जयाठायी विश्वाचे प्रकटने ।असे का कधी काही उणे ।कामधेनु ठायी ॥३०९॥
कामधेनुसी जेधवा जो मागे । ते ती त्वरितच प्रसवू लागे । तेवि विश्व होऊनी आंगे । प्रकटते आत्मतत्त्व ॥३१०॥
जो जगती एकत्व पावून । सर्व विश्वाला करी नमन । हीच तया ओळखण्याची खूण । जाण अर्जुना ॥३११॥
हा सामान्य हा विशेष । ऐसे म्हणणे तो महादोष । येथे मीच एक अशेष । भरला आहे ॥३१२॥
साधारण आणि चांगली । ऐसी जयाने विभागणी केली । मती तयाची वाया गेली । भेद करता ॥३१३॥
तूप का कोणी घुसळते । अमृत का आटवावे लागते । वायूसी का कोणी म्हणते । उजवे डावे ॥३१४॥
नसे पाठपोट सूर्यबिंबासी । तसा नाही भेद मजसी । एकत्व पावता आत्मतत्त्वासी । सरे भेद ॥३१५॥
या विभूतींना जाणून । नच होतसे आत्मतत्त्वाचे ज्ञान । म्हणून हे विभूति वर्णन । थांबवू आता ॥३१६॥
माझ्या एकाचि अंशाने । अवघे जग मी व्यापिले असणे । केवळ समत्व साक्षीने । ज्ञान माझे ॥३१७॥
ऐसा ऐश्वर्यवान आणि श्रीमंत । जो विश्वाठायीचा वसंत । बोलता जाहला भगवंत । अर्जुनासी ॥३१८॥
अर्जुन म्हणे भगवंतासी । तू रहस्य सांगितले आम्हासी । मनी त्यागता त्या भेदासी । प्राप्ती तुझी ॥३१९॥
देवा तुझे समोर असणे । मग आम्हा नलगे काही करणे । सूर्य का लागे अंधार घालवणे । देवा कधी ॥३२०॥
तुझे स्वरूप ते मनी चिंतता । नि अंतरी तुजसी एकत्व पावता । संपून जाते ती भेदता । अंतर्बाहय ॥३२१॥
भगवंता तू समोर असता । कैसी राहील ती भेदता । द्वैताची ती वार्ता । नाही अंतरी ॥३२२॥
शिरल्यावर चंद्राच्या गाभाऱ्यात । देवा कधी का उकडतं । आपुले ते थोरपण झाकतं । बोलता तुम्ही ॥३२३॥
मग अर्जुनाचिया बोला । भगवंत संतोष पावला । आणि आलिंगन देऊन म्हणाला । रागवू नको ॥३२४॥
करून विभूतिंचं वर्णन । मी तपासले तुझे अंत:करण । तव अंतरी भेदासी स्थान । नाही अर्जुना ॥३२५॥
अर्जुना तू भाग्यवान । तुझ्या त्या पुण्याईकारण । प्रकटलं गहन ब्रह्मज्ञान । तुझेठायी ॥३२६॥
तपासण्या तुझे अंत:करण । वर वर केले विभूतिंचे वर्णन । परि मी देखतसे ज्ञान । अंतरी तुझ्या ॥३२७॥
अर्जुन आत्मरूपी पावला । ऐसा संजय जेधवा बोलला । धृतराष्ट्र निवांतचि राहिला । ऐकून ते ॥३२८॥
धृतराष्ट्राचं ते वर्तन पाहून । गेला संजय दुखावून । तयाचं आत बाहेर अंध असणं । जाणलं त्याने ॥३२९॥
परि आता तो अर्जुन । जाणून स्वत:चे आत्मकल्याण । करण्या भगवंताचे दर्शन । आतुर झाला ॥३३०॥
म्हणे एकत्व जे अंतरी अनुभवले । ते जर का डोळ्यास दिसले । मग भगवंता धन्य झाले । जीवन माझे ॥३३१॥
माझं विश्वी एकरूप असणं । मी अनुभवलं डोळ्यानं । माझ्यासारखा भाग्यवान । नाही कोणी ॥३३२॥
अर्जुनावर कृपा भगवंताची । जशी शाखा कल्पतरूची । पूर्तता त्याच्या इच्छांची । अनिवार्यच की ॥३३३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

बा प्रल्हादाचिया बोला। विषही जो आपणच जाहला। तो सद्गुरू असे जोडला। अर्जुनाने अंतरी ॥३३४॥
ती विश्वरूप दाखवण्याची मागणी । कैसी केली अर्जुनानी । पुढे सांगेन ती कहाणी । म्हणे ज्ञानदेव ॥३३५॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विभुतियोगोनाम दशमोऽध्याय: ॥१०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९९६७४८२०